# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

दुरध्वनी क्र. ;EPBX 0712-2565403 /2560209 /2553401 /2553360 FAX NO.0712-2561775
विभागीय अध्यक्षः 2560319 /2562766 विभागीय सचिवः 2560319 /2560166

**अत्यंत महत्वाचे**

पत्र क्रमांकः नाविमं / पउमा / योग्यता / 2180
नागपूर , दिनांक : 15/06/2018

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :– सन 2018–19 या शैक्षणिक वर्षातील महाराष्ट्राबाहेरील राज्यातून / परदेशातून या विभागातील मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणा–या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठी मंडळाकडे अर्ज सादर करणेबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती यापूर्वीच कळविण्यात आली असली तरी सन 2018–19 या शैक्षणिक वर्षाकरीता राज्य मंडळामार्फत सुचविण्यात आलेले बदल पुनःश्च खाली नमूद करण्यात येत आहेत.

1) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरून / परदेशातून या विभागातील संलग्न कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक असतील त्यांनी सर्वप्रथम या मंडळातून योग्यता प्रमाणपत्राचा निर्धारित अर्ज परप्रांताकरीता शुल्क रू. 100/– व परदेशाकरीता रू. 500/– रोखीने / चलनाद्वारे भरणा करून प्राप्त करावा व ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे प्रवेश घेते वेळी आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा अशा सूचना कनिष्ठ महाविद्यालयाने प्रवेशासाठी दिल्या जाणा-या माहिती पत्रकामध्ये ( PROSPECTUS) नमूद कराव्यात.

2) मंडळ कार्यालयात विक्रीस उपलब्ध "लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका" या पुस्तिकेत अधिकृत समकक्षता यादी प्रकाशित केलेली आहे. तसेच अद्ययावत समकक्षता यादी मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर यादीचे अवलोकन व्हावे. या समकक्षता यादीवरून विद्यार्थी कोणत्या इयत्तेत प्रवेशास पात्र ठरतो, तसेच सदर मंडळाला मान्यता आहे किंवा नाही हे प्रथमतः निश्चित करावे. समकक्षतेप्रमाणे इयत्ता जुळते की नाही याची खात्री झाल्यानंतरच योग्य त्या इयत्तेत विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात यावा व त्यानंतरच विभागीय मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्रासाठी सर्व कागदपत्रे खालील अनुक्रमांक 7 मध्ये दर्शविलेल्या दिनांकास किंवा तत्पूर्वी हस्तपोच पाठवावेत.

3) इयत्ता 11 वी गणित विषयासह विज्ञान शाखा प्रवेशाकरिता इ. 10 वी विज्ञान विषयासह गणित विषयात किमान 35% गुण अनिवार्य आहे. इ. 10 वी परीक्षा सामान्य गणित विषयात उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास कुठल्याही शाखेतील गणित विषयाला इ.11 वी ला प्रवेश देण्यात येऊ नये. तसेच कनिष्ठ महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना योग्यता प्रमाणपत्रांबाबत खालील महत्वाच्या कागदपत्राची पूर्तता होणे आवश्यक आहे.